९५

अति तातडीचे

क्रमांक: पीओजेस १२८६/गोवा/स्वासै कक्ष,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक: १९८८

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी.

विषय – गोवा मुक्ती संग्रामामध्ये भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना इतर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे पेन्शन व इतर आर्थिक सवलत देण्याबाबत...

संदर्भ – शासन निर्णय, क्र. पीओजेसं १२८६/[३]/स्वासै कक्ष, दिनांक ७ ऑगस्ट १९८६.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, गोवा मुक्ती संग्रामामध्ये भाग घेतलेल्या ज्या स्वातंत्र्य सैनिकांना शासनाने पेन्शन मंजूर केली आहे, अशा स्वातंत्र्य सैनिकास जिल्हा कार्यालयातून सन्मानपत्र, ओळखपत्र व इतर आर्थिक सवलती देण्यात येत नाही.

२. शासन निर्णय, क्रमांक पीओजेस १२८६ [३] स्वा.सै. कक्ष, दिनांक ७ ऑगस्ट १९८६ अन्वये शासनाने गोवा स्वातंत्र्य सैनिकांना इतर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे पेन्शन व इतर आर्थिक सवलती देण्याचा निर्णय घेतलेला आहे व तसे स्पष्ट आदेश शासनाने दिलेले आहे. तेव्हा गोवा मुक्ती संग्रामामध्ये भाग घेतलेल्या ज्या स्वातंत्र्य सैनिकांना शासनाने पेन्शन मंजूर केली आहे अशा स्वातंत्र्य सैनिकांना सन्मानपत्र, ओळखपत्र व इतर आर्थिक सवलती वरील शासकीय निर्णयानुसार देण्यात याव्यात.

[ दे. त्र्य. कुमावत]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

न.

प्रती.